# ग्रीनलॉन्स विदयालय

**दिनांक - २९-०९-२०२५** **TERMINAL EXAMINATION (2025)** **वेळ – २ तास**

**इयत्ता - ६वी - अ,ब,क** **मराठी** **मार्क - ८०**

**<u>INSTRUCTIONS:-</u> 1.This paper comprises of two sections.Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself.**

**And Attach paper with section A answer sheet.**

**विभाग - "अ"** **[४० मार्क]**

प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. तिचा चेहरा ------------------------------- दिसत होता.

( दुःखी, प्रसन्न, आनंदी )

२. गुरुजींनी मोठ्या ---------------------------- भीमरावाच्या डोक्यावरून हात फिरवला.

( जोराने, मायेने, प्रेमाणे )

३. आज साऱ्या गावात कुंदाच्या -------------------------------- चर्चा होती.

( हुशारीची, साहसाचीच, सहसाचीच )

४. आता मात्र त्यांच्या मनात ------------------------------ निर्माण झाले.

( कुतूहल, भीती, कुतुहूल )

५. पाहता पाहता ती पट्टीची ------------------------ बनली होती.

( जलतरुणपटू, जलतरुणपटु, जलतरणपटू )

प्रश्न २.अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ५) (ANY 5)** [५]

१. झाडे, शेते हिरवीगार कशामुळे झाली होती?

२. कुंदा केव्हा पोहायला शिकली होती?

३. कवयित्रीला सूर्यकिरण का व्हावेसे वाटते?

४. मुलाने बाळाला मांडीवर का घेतले?

५. हे खरे खरे व्हावे या कवितेच्या कवयित्री कोण आहेत?

६. उदयानात भेटलेला विदयार्थी या पाठाचे कवी कोण आहेत?

७. चर्नी रोड उदयानात केळूस्कर गुरुजी कशासाठी येत?

प्रश्न २.ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ३)** [६]

१. धुके बनून कवयित्रीला काय करावेसे वाटते?

२. उदयानात गुरुजींचे कोणाकडे लक्ष गेले?

३. मुलांना गहिवरून का आले?

४.नदीच्या काठावरचे लोक कुंदाला कोणत्या सूचना देत होते?

प्रश्न २.क) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. [३]

| |
|---|
| मी, पक्षीं, सतत, माझ्या, नेहमी, आवकाशी, स्वार, ,अवकाशी, मि, फिरुनी, माझा, पक्षी |

हवेवरी त्या होत ----------------------------

-------------------------------------- विरहावे,

मनात ----------------------------------- येते

मी ---------------------------------व्हावे...

प्रश्न ३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

आज रविवार. कुंदाच्या शाळेला सुटटी होती. कुंदा व तिच्या मैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला गेल्या होत्या. नदीकाठच्या कडूनिंबाच्या मोठ्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हासत - बागडत खेळत होत्या. दूरवर शेतात शेतकरी व काही बायका कामात मग्न होत्या.

खेळता खेळता लहानगी रझिया व नीला नदीकडे केव्हा गेल्या, ते कळलेच नाही. इकडे कुंदा व तिच्या मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या. एवढ्यात नीलाचा मोठमोठ्याने रडण्याचा व ओरडण्याचा आवाज आला. 'धावा! धावा! लवकर या, रझिया पाण्यात पडली.' 'कुणीतरी वाचवा हो!' ही हाक कुंदाच्या कानावर पडल्याबरोबर ती धावतच नदीकिनारी पोहोचली.

कुंदाने क्षणात नदीच्या पात्रात उडी घेतली व सरसर पोहत रझियाच्या दिशेने निघाली. तोवर आजूबाजूचे लोक जमा झाले. 'अरेऽ अरेऽ रझिया बुडते आहे. एवढीशी कुंदा तिला कशी वाचवणार ? लोक जोरजोरात ओरडत होते, कुंदाला फक्त रझिया दिसत होती.कसेही करून तिला वाचवायचे एवढाच विचार तिच्या मनात होता. कोणाचेही शब्द तिच्या कानावर पडत नव्हते. भरभर पोहत कुंदा रझियाजवळ पोहोचली. रझिया घाबरली होती. तिच्या नाकातोंडात पाणी गेले होते. 'रझिया घाबरू नको, मी आले आहे. आता फक्त माझ्या दंडाला घट्ट धर.'

कुंदाने रझियाला काठाकडे आणले. तोवर लोकांनी मोठा दोर पाण्यात सोडला होता. कुंदाने त्याला धरले. सर्वांनी या दोघींना बाहेर काढले.

ही बातमी रझियाच्या घरीही पोहोचली. तिची आई धावत आली. त्या दोघी सुखरूप पाहून तिने दोघींना घट्ट कवटाळले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. 'कुंदा, आज तुझ्यामुळेच माझ्या रझियाचा जीव वाचला. केवढी धाडसी मुलगी आहेस तू!'

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. पोहत पोहत रझियाला वाचवायला कोण पोहोचली?

२. कुंदा व तिच्या मैत्रिणी कुठे खेळायला गेल्या होत्या?

३. दूरवर शेतात कोण-कोण कामात मग्न होते?

**कृती २.** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. रझियाची आई कुंदाला काय म्हणाली?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. आता फक्त माझ्या ------------------------- घट्ट धर.

२. त्या दोघी ------------------ पाहून तिने दोघींना घट्ट कवटाळले.

**कृती ४.** कोण-कोण म्हणाले ते लिहा. [१]

१."केवढी धाडसी मुलगी आहेस तू!"

**कृती ५.** खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

( लांबवर, दूरवर, पुरुष, बायका)

१. जवळ X --------------------------- २. माणसे X --------------------------------

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. **(ANY 1)** [५]

१. माझा देश

**मुददे** - देशाची संस्कृती - जंगले - विविध धर्म - थोर लोकांचा जन्म - देश प्रिय का आहे.

२. मामाचे गाव

**मुददे** - गावाचे नाव -गावाचे वर्णन - गावात काय पहिले - गावाची जत्रा - कशी मज्जा केली.

३. माझे बाबा

**मुददे** - बाबांचे वर्णन, ते काय करतात, गोष्टी सांगणे - ते नसले की आठवण येणे - तुम्हाला होणारी मदत,

प्रश्न ५. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

सदूचे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्याच्या घरातले वळण चांगले होते. वडील गेल्यामुळे घरी तशी गरिबीच पण हृदयाची श्रीमंती सर्वच माणसांत होती. सदू शाळेत एक हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता.

चित्रकलेच्या स्पर्धा एका समितीने जाहीर केल्या होत्या. सदू सुंदर चित्रे काढी. त्याने स्पर्धेसाठी नाव नोंदवले. स्पर्धा तालुक्याच्या ठिकाणी सकाळी ११ वाजता होत्या. सदू परीक्षेसाठी सदू तालुक्याला गेला. चित्रकलेचे इतर साहित्य त्याने घेतले होते. मित्रांसह तो पेन्सिल विकत घेण्यास एका दुकानात गेला. पेन्सिल घेण्यासाठी एकदम ५-६ मुले सकाळीच आलेली पाहून दुकानदार खूश झाला. त्यांचे खेडवळ गणवेश पाहून त्याला हसू आले.

सदूने दुकानदाराला चांगल्या प्रतीची ड्रॉइंग पेन्सिल दाखविण्यास सांगितले. दुकानदाराने एक जर्मनी व एक इंग्लंडमध्ये तयार झालेली पेन्सिल दाखवली. सदूने विचारले, 'तुम्ही देशी चांगल्या प्रतीच्या पेन्सिली ठेवत नाही का?' हो; हो, ठेवतो तर. पण त्या महाग आहेत. तुला चांगली पेन्सिल हवी व स्वस्त हवी म्हणून ही पेन्सिल दाखवली. 'सदू जर्मन पेन्सिल घे. स्वस्त अन् मस्त', मित्र म्हणाले. 'आपल्या देशातील पेन्सिलच थोडी महाग असली तरी मी घेणार.' खेडवळ गणवेशातील सदू म्हणाला. 'बाळ, ही चांगली पेन्सिल तुला भेट म्हणून घेऊन जा. अन् परीक्षेत यश मिळव.' दुकानदार म्हणाला.

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [५]

१. स्पर्धा कोठे व किती वाजता होत्या?

२. सदू शाळेत काय म्हणून प्रसिद्ध होता?

३. सदूचे वडील कोण होते?

४. दुकानदार खूश का झाला?

५. सदूने दुकानदाराला काय सांगितले?

**कृती २.** कोण-कोणास म्हणाले ते लिहा. [१]

१. "ही चांगली पेन्सिल तुला भेट म्हणून घेऊन जा."

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. ------------------------------ स्पर्धा एका समितीने जाहीर केल्या होत्या.

२. दुकानदाराने एक -------------------------- व एक इंग्लंडमध्ये तयार झालेली पेन्सिल दाखवली.

**कृती ४.** विरुद्धार्थी शब्द लिहा. [१]

(चांगले, पैसेवाले, श्रीमंत, घाणेरडे)

१. गरीब X ------------------------------ २. वाईट X ------------------------------------

**ग्रीनलॉन्स विदयालय**

**INSTRUCTIONS- Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

**नाव - ------------------------------------------ हजेरी क्र. ---------- इयत्ता - ६- अ,ब,क**

**विभाग - " ब "** **[४० मार्क]**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. [३]

पटकन हसणे, आरूढ असणे, ऐकू येणे, गोंधळ वाढणे, स्तुती करणे, आरूढ होणे, गुंग होणे, गोंधळ घालणे, जोरात हसणे

१. तल्लीन होणे - ---------------------------------------- २. स्वार होणे - ----------------------------------------

३. खुदकन हसणे -------------------------------------- ४. गलका वाढणे - ----------------------------------

५. कौतुक करणे - ---------------------------------------- ६. कानावर पडणे - --------------------------------

प्रश्न २ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [४]

१. शिवबा पराक्रमी राजे होते. `

उत्तर - नाम - ---------------------------------- नामाचा प्रकार - ----------------------------------------

२. नदीत पाणी खूप होते.

उत्तर - नाम - ----------------------------------- नामाचा प्रकार - ----------------------------------------

३. राम एक गरीब मुलगा आहे.

उत्तर - नाम - ----------------------------------- नामाचा प्रकार - ----------------------------------------

४. कमळाची फुले मजेत डुलत होती.

उत्तर - नाम - ------------------------------------ नामाचा प्रकार - ----------------------------------------

प्रश्न २ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [४]

१. ते झाड माडाचे आहे. सर्वनाम - -------------------------------------------

२. आपण नेहमी परिश्रम केले पाहिजे. सर्वनाम - -------------------------------------------

३. हे पत्र कोणी कोणाला लिहिले आहे? सर्वनाम - ------------------------------------------

४. तिचा चेहरा उदास दिसत होता. सर्वनाम - -------------------------------------------

प्रश्न २ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [४]

१. रमेश बेशिस्त आणि आळशी मुलगा आहे.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ------------------------------------------

२. ते विजापूर शहर सुंदर आहे.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ------------------------------------------

३. त्याचे मिठाईचे मोठे दुकान होते.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ------------------------------------------

४. दुकानदाराने दहा गणपतीच्या मुर्त्या मागवल्या.

उत्तर - विशेषण - ------------------------------ विशेषणाचा प्रकार - ------------------------------------------

प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

| |
|---|
| जिर्ण, प्रेरणा, स्वर्ग, निश्चछ, कोपरा, मुली , कॉपरा, निश्चय, स्वर्गं, जीर्ण, |

१. संकल्प - ------------------------------------ २. जुने - ------------------------------------------

३. पोरी - ------------------------------------ ४. कोनाडा - ------------------------------------

५. वैकुंठ - ------------------------------------ ६. स्फूर्ती - ------------------------------------

प्रश्न ३ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

| |
|---|
| अपमान, गौन, स्वामी, विस्मरण, अर्वाचीन, जगणे, स्वामि, जीवन, गौण, विस्मरन, आपमन |

१. आठवण - ------------------------------------ २. प्रमुख - ------------------------------------

३. प्राचीन - ------------------------------------ ४. सेवक - ------------------------------------

५. मृत्यू - ------------------------------------ ६. सन्मान - ------------------------------------

प्रश्न ३ क) खालील शब्दांचे वचन बदला. [४]

१. दुकान - ------------------------------------ २. चिपळी - ------------------------------------

३. चौथरा - ------------------------------------ ४. घोंगडी - ------------------------------------

५. बाहुली - ------------------------------------ ६. वाटचाल - ------------------------------------

७. घाणा - ------------------------------------ ८. तलवार - ------------------------------------

प्रश्न ३ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. [४]

१. नवरा - ----------------------------------------- २. मित्र - -----------------------------------------

३. मालक - ----------------------------------------- ४. मास्तर - -----------------------------------------

५. दिवटा - ----------------------------------------- ६. भाऊ - -----------------------------------------

७. मुलगा - ----------------------------------------- ८.नायक - -----------------------------------------

प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [३]

| प्रेमाने, घुंगूरवाले, ऊत्सुकपणे, उत्साही, उष्णता, उत्सुकतेने, घुंगुरवाळे, ठामपणे |
|---|

१. उर्जा - ----------------------------------------- २. निश्चित - -----------------------------------------

३. स्नेहाने - ----------------------------------------- ४. प्रसन्न - -----------------------------------------

५. आतुरतेने - ----------------------------------------- ६. पैंजण - -----------------------------------------

प्रश्न ४ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा.(make sentences using these words) [४]

१. किलबिल (Chirping)- -----------------------------------------------------------------------------------------

२.प्रवाह (Flow)- -----------------------------------------------------------------------------------------

३. धमाल (Fun)- -----------------------------------------------------------------------------------------

४. बातमी (News)- -----------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ४ क) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [२]

१. गटांगळ्या, गटांगल्या, गटांगलंया, गटांग्गल्या - -----------------------------------------

२. विद्याविभूषीत, विध्याविभीषित, विध्याविभुषित, विदयाविभूषित - -----------------------------------------

३. मिशिकिलतेने, मिष्किलतेने,मिष्कीलतेने, मिश्किलतेने - -----------------------------------------

४. कुतुहल, कुतुहूल, कुतूहल, कुतुहलं - -----------------------------------------

प्रश्न ४ ड) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा. [२]

| **क्र.** | **विरामचिन्हे** | **उत्तर** | **चिन्हांची नावे** |
|---|---|---|---|
| १. | ; | ----------------------------------- | अपूर्ण विराम |
| २. | , | ----------------------------------- | प्रश्नचिन्ह |
| ३. | : | ----------------------------------- | स्वल्पविराम |
| ४. | ? | ----------------------------------- | अर्धविराम |